www.ecourtsindia.com



**<u>नि.क्र.२०३ वरील आदेशाप्रमाणे प्रतिवादीस उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात आली-</u>**

**<u>नि.क्र.९६ वरील दिनांक ०६.०१.२०२४ रोजीच्या आदेशान्वये वादीचे कागदपत्रांना नि.क्र.१०३ ते १३३ देण्यात आली आहे.</u>**

**<u>शपथेवर उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. व्ही.एम. देशपांडे यांच्याव्दारे-</u>**

२६– माझे शिक्षण पदवी पर्यंत झालेली आहे. मी कला शाखेची पदवी घेतलेली आहे. मी संगणकाचा कोर्स, आय.टी.आय. किंवा मॅकेनिकल बाबतचा कोर्स केलेला नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की मी बि.ए.ची पदवी घेण्या अगोदर दोन वर्ष बि.ई. चे शिक्षण घेत होतो. मी प्रोडक्शन व मॅकेनिकल या शाखेत इंजिनिअरींग चे शिक्षण घेत होतो. मी ते शिक्षण पूर्ण केले नाही. त्यावेळी ईलेक्ट्रीकल इंजिनिअरींग, मॅकेनिकल इंजिनिअरींग, मशिन टुल्स हे विषय मला पहिल्या वर्षात होते. मी कोणत्या विषयात पास झालो होतो व कोणत्या विषयात नापास झालो होतो हे मला आठवत नाही.

२७– स्मॉल स्केल इन्डस्ट्रीज सुरु करण्यासाठी महानगर पालिका व सरकारकडुन परवाना घेणे आवश्यक असते. हे म्हणणे खरे नाही की माझ्याकडे तसा कोणताही परवाना नसल्याने मी तो अभिलेखावर दाखल केलेला नाही. विज पुरवठा मोजण्याचे एकक–युनिट म्हणजे एम्पीअर हे आहे. कोणतेही विद्युत उपकरण किती विज वापरते हे मोजण्याचे एकक कोणते आहे हे मला माहिती नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की ते विज मिटरमध्ये नोंदले जाते. वॅट म्हणजे विजेची शक्ती मोजण्याचे एकक आहे. ज्युल्स म्हणजे काय हे मला माहिती नाही. कोणतेही विद्युत उपकरण किती विजेचा वापर करते हे मोजण्याचे युनिट म्हणजे हॉर्स पावर आहे असे माझे म्हणणे आहे. कोणतेही विद्युत मशिनची ताकद हॉर्स पावरमध्ये मोजली जाते. ती मशीन किंवा उपकरण किती विद्युत वापरते याचे मोजमाप हॉर्स पावरमध्ये होत नाही. ती मशीन किंवा उपकरण किती विद्युत वापरते याचे मोजमाप अम्पीयरमध्ये केल्या जाते. एम्पीयर हे करंट मोजण्याचे युनिट आहे असे माझे म्हणणे आहे. एम्पीयर, वॅट व ज्युल्स यामध्ये असा फरक आहे की

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAK020032372019/truecopy/order-5.pdf

एम्पीयर हे करंट मोजण्योच युनिट आहे, वॅट हे पावर–ताकद मोजण्याचे युनिट आहे व मला ज्युल्स बाबत काहीही माहिती नाही.

२८– सन २००१ पूर्वी माझे ऑईल मिल युनिट होते. ते माझ्या नावावर होते. पूर्वी व वादातील इंडस्ट्रीजचे बिलाचे पूर्वी मी बिल जमा करणे, त्याकरीता चेक देणे ही कामे करण्यासाठी नोकर ठेवलेला होता. त्याचे नाव मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की तो नोकर विज पुरवठा मिळण्यासाठी अर्ज देणे, एमएसईबी कार्यालयात जाणे ही कामे सुध्दा करीत होता. वादातील इंडस्ट्री करीता मी २२५ के.व्ही. विद्युत पुरवठ्याची मागणी केली होती. कॉन्ट्रक्ट डिमांड म्हणजे मी मागणी केलेल्या २२५ के.व्ही. पैकी मी किती वापर करेन याबाबत एमएसईबी सोबत झालेला करार आहे. माझी कॉन्ट्रक्ट डिमांड २२५ के.व्ही. होती.

**प्रश्नः** कॉन्ट्रक्ट डिमांड २२५ के.व्ही. पेक्षा जास्त विज पुरवठा वापरल्यास तुमचा विज पुरवठा तात्काळ खंडीत होऊ शकतो असे काही असते काय ?
**उत्तरः** त्याबाबत मला माहिती नाही.

२९– हे म्हणणे खरे नाही की कॉन्ट्रक्ट डिमांड पेक्षा जास्त विज पुरवठा वापरल्यास विज पुरवठा सुरु राहतो व त्या वापराची नोंद विज मिटरमध्ये केली जाते.

३०– दयाल एग्रो येथे अनरिफाईन्ड तेलास रिफाईन्ड केल्या जाते. जानेवारी ते मार्च महिन्या दरम्यान रब्बी पिक तयार होते. मी अनरिफाईन्ड तेल ऑईल तयार करणाऱ्या कंपन्याकडुन घेतो. ऑईल तयार करणाऱ्या कंपन्या अडत बाजारातुन तेल वाण विकत घेऊन तेल काढतात. रब्बी पिक तयार झाल्यावर जानेवारी ते मार्च महिन्यादरम्यान तेल वाणापासुन तेल काढण्याच्या व्यवसायात तेजी असते किंवा नाही याची मला माहिती नाही. आम्ही लोकल मार्केटमधुन व इम्पोर्ट करुन कच्चे तेल घेतो व आमची फॅक्ट्री चालवितो. आम्ही मुंबई येथील इम्पोर्ट एजंट कडुन कच्चे तेल घेतो.

३१– वादी ही लिमीटेड कंपनी आहे. तिची कंपनी कायद्याखाली नोंदणी झाली आहे. कंपनी कायदा, कामगार कायदे, आयकर व जि.एस.टी. कायदे

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAK020032372019/truecopy/order-5.pdf

याखालील आवश्यक असलेल्या सर्व नोंदी आम्ही ठेवलेल्या आहेत. आमची कंपनी सुरु झाल्यापासुन सदरच्या नोंदीचे अभिलेख आम्ही ठेवले आहेत. जानेवारी २००१ पासुन ते डिसेंबर २००१ पर्यंत आमचे कंपनीमध्ये किती माल आला व किती माल प्रक्रिया करुन विकल्या गेला याबाबतच्या नोंदी आज रोजी अस्तित्वात नाहीत. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की त्या अनट्रेसेबल आहेत. आमच्या पूर्वीच्या व सध्याच्या दयाल एग्रो या व्यवसायाचा बाजारपेठेत चांगला नावलौकिक आहे. हे म्हणणे खरे नाही की आमच्या पूर्वीच्या व्यवसायाचे व काही नविन ग्राहक दयाल एग्रो या कंपनीशी जोडल्या गेले होते. हे म्हणणे खरे नाही की मार्च २००१ ते जुलै २००१ पर्यंत आमच्या कंपनीत मोठ्या प्रमाणात कच्चे तेल विकत घेऊन त्यावर प्रक्रिया करुन विक्री केल्या गेले त्यामुळे आमचा विज वापर जास्त प्रमाणात झाला होता ही बाब लपविण्यासाठी मी स्टॉक रजिस्टर व विक्री रजिस्टर न्यायालयासमोर आणलेले नाही.

३२- दयाल एग्रो कंपनीस संचालक मंडळ आहे. हा दावा दाखल करण्यासाठी, वकिलांना माहिती देण्यासाठी, पुरावा देण्यासाठी अधिकार देणेबाबत संचालक मंडळाचा माझ्या नावाने ठराव झालेला आहे. तो ठराव न्यायालयात दाखल आहे. हे म्हणणे खरे नाही की असा कोणताही ठराव झालेला नाही त्यामुळे मी अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की मला दयाल एग्रो कंपनीतर्फे दावा दाखल करण्याचा, चालविण्याचा व पुरावा देण्याचा कोणताही अधिकार नाही.

३३- माझे शपथपत्रातील मधील के.व्ही.ए. चा अर्थ किलो, व्होल्ट व एम्पीअर असा होतो. सन २००१ मध्ये मी किती कच्चे तेल स्थानिक बाजारपेठेतुन व किती आयात करुन घेतले हे मी सांगू शकत नाही. मी सन २००१ मध्ये कायदेशीर पध्दतीने परवाना व पक्की बिले घेऊन माझे इंन्डस्ट्रीयल युनिटची स्थापना केली होती. त्यावेळी मी विकत घेतलेल्या मशीनची बिले, वॉरन्टी कार्ड, युजर मॅन्युअल ही योग्य पध्दतीने जतन करुन ठेवलेली आहेत. आम्ही जी मशीन लावतो तिची शक्ती हॉर्स पावरमध्ये असते. सन २००१ मध्ये ३०० हॉर्स पावरची मशीनरी आम्ही लावली होती व ९४ हॉर्स पावरची मशीनरी आमच्याकडे स्टॅन्डबाय म्हणून ठेवलेली होती. हे म्हणणे खरे नाही की सन २००१ मध्ये माझ्या

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAK020032372019/truecopy/order-5.pdf

www.ecourtsindia.com



कंपनीमध्ये ४०० हॉर्स पावरपेक्षा जास्त मशीनरी लावलेली होती व ही बाब लपविण्यासाठी मी मशीनची बिले व कागदपत्रे न्यायालयात सादर केलेली नाहीत. सन २००१मध्ये माझ्या कंपनीत ३९४ हॉर्स पावरची मशीनरी लावली होती याबाबत मी कागदपत्र दाखल करु शकतो. एप्रिल २००१ ते जुलै २००१ या कालावधीत स्टॅन्डबायवर ठेवलेली मशीनरी वापरली नाही असे दर्शविणारे कागदपत्र मी दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की मुख्य वापराच्या मशीनमध्ये बिघाड झाल्यास किंवा मालाची मागणी वाढल्यास स्टॅन्डबाय मशीनचा वापर केला जातो. हे म्हणणे खरे नाही की वादातील बिलांच्या कालावधीत मी माझ्या नियमीत वापराच्या व स्टॅनडबाय च्या मशीनचा पूर्ण क्षमतेने वापर केला होता.

३४– एच.टी. कंझ्युमर म्हणजे हाय टेंशन कंझ्युमर असतो. मी कंपनी स्थापन झाल्यापासुन कंपनी कायद्यांतर्गत व स्मॉल स्केल इंन्डस्ट्रीला लागणाऱ्या कायद्या व धोरणांतर्गत किती माल आला, किती विकला त्याबाबतचे रिटर्न व रिपोर्ट संबंधित कार्यालयास नियमीत दाखल करीत आहे. त्याचा अभिलेख कंपनीकडे जतन केलेला आहे. माझ्याकडे कंपनीचा आर्टीकल ऑफ असोशिएशन व मेमोरंडम ऑफ असोशिएशन उपलब्ध आहे. आर्टीकल ऑफ असोशिएशनवर कंपनीचे भांडवल, कोणत्या मशीनरी घेऊन कोणत्या स्वरुपात व्यवसाय करायचा व येणाऱ्या काळात कसा व्यवसाय करायचा याबाबतचा उल्लेख केलेला असतो. हे म्हणणे खरे नाही की आर्टीकल ऑफ असोशिएशन मध्ये ३९६ हॉर्स पावरपेक्षा जास्त शक्तीच्या मशीनचा उल्लेख केलेला आहे. कंपनीच्या सभासदांची यादी मेमोरंडम मध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यामध्ये माझे नाव नमुद नाही म्हणून मी ते दाखल केलेले नाही.

३५– प्रतिवादी क्र.१ चे अधिकारी ग्राहक मंच्याचा आदेश झाल्यावर पहिल्यांदा इंडस्ट्री व मिटरचे निरीक्षण करण्यासाठी आल्याचे मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ चे अधिकारी कधीही निरीक्षणासाठी आले नाही असे माझे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे नाही की दिनांक २८.०६.२००१ रोजी प्रतिवादींनी नविन मिटर लावले असे मी चुकीचे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी वादातील बिलाच्या कालावधीत नेहमीच्या मशीन, स्टॅन्डबाय मशीन व बेकायदेशीरपणे

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAK020032372019/truecopy/order-5.pdf

जास्तीच्या मशीन लावल्या व वापरल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादींचे अधिकारी कंपनीत येण्यापूर्वी मी स्टॅन्डबाय व बेकायदेशीरपणे लावलेल्या मशीन काढुन टाकल्या होत्या. मी त्या कालावधीत स्टॅन्डबाय मशीन वापरल्या नाहीत हे दर्शविणारे कागदपत्र आवश्यकता असल्यास दाखल करु शकतो.

३६– माझे शपथपत्रात नमुद केलेल्या एम.डी.चा अर्थ मिटर डिमांड असा आहे. सन २००१ मध्ये माझ्या कंपनीत किती कर्मचारी होते हे मी सांगू शकत नाही. त्यावेळी कंपनीत किती व कोण कर्मचारी होते याचे रेकॉर्ड मी ठेवले होते. ते आता अनट्रेसेबल आहे. त्या कालावधीत मी सुपरवायझर नेमलेला होता. त्यावेळी कंपनीतून सर्व कामकाज सुपरवायझर पाहत होता. वादातील बिलाचे मिटर रिडींग घेतांना सुपरवायझर हजर होता किंवा नाही हे मला आठवत नाही. वादातील बिलाचे रिडींग घेणारा मिटर रिडर कोण होता त्याचे नाव मला आठवत नाही. मिटर रिडर व कंपनीचा नोकर यांच्यामध्ये मिटरमध्ये फॉल्ट आहे असे बोलणे झाले होते. मला त्याबाबत माझ्या नोकराने सांगितले होते. त्यावेळी मी प्रत्यक्ष हजर होतो किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे शपथपत्रातील परिच्छेद क्र.५ मधील मजकूर मी खोटा नमूद केला आहे. माझे असे म्हणणे आहे की मिटर रिडींग घेतांना आमच्या कंपनीचा जो नोकर हजर होता त्याचे असे मत होते की मिटरमध्ये फॉल्ट आहे. मिटर रिडींग घेणाऱ्यास मिटरच्या रिडींग नोंदणीबाबत तांत्रिक माहिती आहे किंवा नाही याची चौकशी माझ्या नोकराने केली नव्हती. मी मिटर रिडींग घेणारा कोण होता, त्याला तांत्रिक ज्ञान होते किंवा नाही याबाबत चौकशी केली होती किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की मिटर रिडींग घेणाऱ्याने मी माझे पुराव्यात सांगितल्याप्रमाणे मिटर फॉल्टी असल्याबाबतचे कोणतेही मत दिले नव्हते.

मध्यान्हांची वेळ झाल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/-

( दि.स. कोलते )

४थे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अकोला

दिः०४.०७.२०२४

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAK020032372019/truecopy/order-5.pdf